FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154207

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि मुंबई, पहिली खबर क्र. FIR No ४३, वर्ष Year २०२१, दिनांक Date ०९/१२/२१

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence Day बुधवार, तारीख पासून Date from ०८/१२/२१ वेळ Time ०९.३०, तारीख पर्यंत Date to ०९/१२/२१ वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८/१२/२०२१ वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०४, तारीख Date ०९/१२/२१ वेळ Time ०६.३०

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral ✓

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name MIDC पोलिस ठाणे अंमलदार कक्ष, MIDC [illegible] रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३, No. ........, Ward ........, Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. चेतन
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कांजी सत्रा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४४ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ९७६९४५९९९०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........, (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste गुजराथी, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : फ्लॅट नं. ८, [illegible] अपार्टमेंट, मरोळ मरोशी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ९३. Ward, House/Name No., Phone/Mo. No., PAN No., Card No.
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   विकास नामदेव लोखंडे, वय ३३ वर्षे, पोलिस उपनिरीक्षक, MIDC पो. ठाणे मुंबई - ९३.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. चेतन कांजी सत्रा, वय ४४ वर्षे, राही - फ्लॅट नं. ८, एन्जॉय अपार्टमेंट, मरोळ मरोशी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३ यांच्या संगणकावर टंकलिखीत केलेला, सोबत जोडलेला जबाब हाच सदर गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे

समक्ष

[signature]

(अरुण घोडके)

पोलिस निरीक्षक

आ.प्र.वि. मुंबई

chetan

<u>फिर्याद</u> दि. ०९/१२/२०२१

चेतन कांजी सत्रा, वय ४४ वर्षे, धंदा – व्यवसाय (रेडीमेड कपडयांचे दुकान, अंधेरी (पु.), मुंबई), रा.ठि – ८, एव्हरजॉय अपार्टमेंट, दुसरा मजला, मरोळ, मरोशी रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०० ०५९, मो. नं. – ९७६९५९१११०

——— o ———

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी मागील ०८ वर्षांपासून माझ्या कुटुंबासह राहत आहे. तसेच मी मिस्कीटा चाळ, शॉप नं. ०३, मरोळ व्हिलेज रोड, मरोळ, अंधेरी (पुर्व), मुंबई येथे शुभम मेन्स वेअर या नावाने रेडिमेड कपडयांचा व्यवसाय मागील सुमारे २६ वर्षापासुन करीत आहे.

माझे कपडयाचे दुकानाजवळ श्रीमती जैसवाल यांची पिठाची गिरणी असुन दिवाळीचे सुमारास आमचेत किरकोळ वादावादी झाली होती त्याबाबत मी तक्रार दिली नव्हती परंतु जैसवाल यांचे मुलीने एम्.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असल्याचे मला एम्.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पी.एस्.आय. श्री. लोखंडे साहेब यांचेकडुन समजले होते. त्यांनी मला मरोळ मरोशी रोडवर असलेल्या बीट क्र. ०३ पोलीस चौकीमध्ये बोलावले होते त्याप्रमाणे मी पोलीस चौकीत गेलो होतो. त्यावेळी तेथे पी.एस्. आय. श्री. लोखंडे साहेब यांनी आमच्यातील वाद आपसात मिटवले होते.

त्यानंतर दिनांक २७/११/२०२१ रोजी पी.एस्.आय. श्री. लोखंडे साहेब यांनी बीट नं. ३, एम्. आय.डी.सी. पोलीस चौकी येथे बोलावून मला एक नोटीस दिली होती. त्यामध्ये तपासकामी हजर राहण्याबाबत लिहीले होते त्यामुळे मी पोलीस चौकी येथे दिनांक २९/११/२०२१ रोजी गेलो असता मला समजले की, लोखंडे साहेब दिनांक ०५/१२/२०२१ रोजी पावेतो रजेवर आहेत.

त्यानंतर दिनांक ०७/१२/२०२१ रोजी मी नेहमीप्रमाणे दुकान बंद करुन घरी गेलो असताना रात्री १०.०० वा. सुमरास मला एम्.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पी.एस्.आय. श्री. लोखंडे यांनी त्यांचा मोबाईल नंबर ८२९१३३२२०९ या वरुन माझा मोबाईल नंबर ९७६९५९१११० वर फोन केला व त्यांनी सांगितले की, "आधे घंटे मे चौकी मे आ जाना, तुम्हारे खिलाफ गुनाह दाखल है। इसमे जामीनदार लेके आना।." परंतू रात्री उशिर झाल्याने मी पोलीस चौकीत गेलो नाही. दिनांक ०८/१२/२०२१ रोजी पुन्हा पी. एस्.आय. श्री. लोखंडे साहेब यांचा सकाळी ०९.०० वा. सुमारास मला फोन आला व त्यांनी लागलीच चौकीला बोलावले त्यामुळे मी ०९.३० वा. सुमारास एम्.आय.डी.सी. पोलीस चौकी बीट नं. ३ येथे गेलो असता मला त्याठिकाणी पी.एस्.आय. श्री. लोखंडे साहेब भेटले. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, "चेतनभाई आपके खिलाफ जैसवाल नामक लडकी ने जो गुन्हा दाखल किया है। वो आपस मे नही निपटा सकते, आपको अ‍ॅरेस्ट करना पडेगा। अगर आप मुझे २०,०००/– रु दे दो तो मै आपको अ‍ॅरेस्ट करके यही पे पोलीस स्टेशनमे छोड देता हू, आपको कोर्ट में नही लेके जाऊंगा।" त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, "साहब, मेरा गलती हुआ है, मै माफी मांगता हूँ, लेकीन मेरे पास इतना पैसा नही है।" त्यावेळी त्यांनी सांगितले की, "आज रात तक कुछ भी करके २०,०००/– रु लेके आना नही तो मै आपको अ‍ॅरेस्ट करुगा और कोर्ट मे भेजुंगा।" असे म्हणुन मला त्यांनी पैसे आणण्यासाठी पाठवुन दिले.

मला पी.एस्.आय. श्री. लोखंडे साहेब यांना रु. २०,०००/– इतकी रक्कम लाच दयावयाची नसल्याने मी त्याबाबत तक्रार करण्यासाठी दि. ०८/१२/२०२१ रोजी दुपारी १३.०० वा. सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहिलो. परंतू मला लिहीता वाचता येत नसल्याने मी लेखी तक्रार अर्ज आणला नसल्याचे सांगून घडलेली हकीकत सांगितली. मी सांगीतलेल्या

हकीकतेप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अरूण घोडके यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत केली व सदरची तक्रार मला वाचुन दाखवून मराठी व हिंदीतून समजावून सांगीतली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर होती. मी दिलेल्या तक्रारी वरून एम्.आय.डी.सी. पोलीस ठाण्याचे पी.एस्. आय. श्री. लोखंडे साहेब यांच्या विरूध्द कारवाई करण्याकरीता पडताळणी व सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री. घोडके यांनी मला सांगून सदर कारवाईत पंच म्हणुन दोन शासकीय कर्मचारी सहभाग घेणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक घोडके साहेबांनी तेथे हजर झालेल्या दोन पंचाशी पंच क्र. ०१ हेमंत वाघेरे व २) विरेंद्र जाधव तसेच सदर कारवाईत परिवेक्षक अधिकारी म्हणुन सहभाग घेणाऱ्या सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. देशमुख साहेबांची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. घोडके हे मला व दोन पंचाना सोबत घेवून पहिल्या मजल्यावर असलेल्या गोपनीय कक्षात घेवून गेले. तेथे त्यांनी आम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्डची माहिती देवून त्यामध्ये माझे, दोन्ही पंच व स्वत: पो.नि. घोडके यांचे वक्तव्य नोंद केले. तद्नंतर मी, नमुद पंच व पो.नि. घोडके, स.पो.आ. देशमुख यांचेसह पडताळणी/सापळा पथकातील कर्मचारी शासकीय वाहन क्र. MH-04-AN-3570 व MH-01-AN-1704 अशा दोन वेगवेगळया शासकीय वाहनातून लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई कार्यालयातून २०.०० वा. चे सुमारास निघुन एएफएल् हाऊस, मरोळ गांव, मरोळ मरोशी, अंधेरी (पुर्व), मुंबई येथे पोहचलो. त्यावेळी रात्रीचे २१.०० वा. होते. आम्ही सदर ठिकाणी पोहचलो असता रात्रौ २१.१५ वा. सुमारास मला माझे मोबाईल क्र. ९७६९५९१११० यावर पी.एस्.आय. श्री. लोखंडे साहेबांचा त्यांच्या मोबाईल क्र. ८२९१३३२२०९ यावरून फोन आला. त्यात त्यांनी मला ''किधर है आप? जल्दी आवो मै रूका हू चौकी मे आपके लीये। असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच मिनटांत पोहचतो असे सांगीतले. त्यानंतर पो.नि. घोडके यांनी सदर कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या तसेच मला एक मोटार सायकल उपलब्ध करण्याबाबत सांगीतल्याने मी माझे मित्राचे करवी मोटार सायकल उपलब्ध केली. त्यानंतर पो.नि. घोडके यांनी माझे शर्टाच्या आत बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावून पी.एस्. आय. लोखंडे साहेबांच्या भेटीला पाठविले असता मी मोटार सायकल क्र MH-02-DP-1821 होंडा युनिकॉर्न वरून पंच हेमंत वाघेरे यांच्यासह एम्.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या मरोळ मरोशी येथील बीट क्र. ३ येथे जाण्याकरीता निघालो ती वेळ २१.१९ वा. ची होती. बीट क्र.०३ येथे पोहचलो. त्यावेळी तेथे पी.एस्.आय. लोखंडे साहेब हजर होते. मी त्यांची भेट घेताच त्यांनी मला जामीनदार व हाताने इशारा करून पैसे घेऊन येण्यास सांगीतले. त्यामुळे मी तेथुन पंच क्र. ०१ यांचे समवेत निघुन पोलीस वाहने जेथे थांबली होती तेथे आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक घोडके यांच्या सुचनेप्रमाणे मी पंच हेमंत वाघेरे यांच्यासह पी.एस्.आय. लोखंडे साहेब यांच्या भेटीकरीता पुन्हा एम्.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या मरोळ मरोशी येथील बीट क्र. ३ येथे जाण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर लावून निघालो त्यावेळी २१.४३ वा. होते. मी सदर ठिकाणी पोहचल्यानंतर पी.एस्.आय. लोखंडे साहेबांची भेट घेतली व जामीनदार मिळत नसून माझे पॅन कार्ड व आधार कार्ड देखील माझेकडे नसुन ते दुकानात आहेत व दुकान आता बंद झाले आहे असे सांगीतले. त्यावर त्यांनी मला अटक करावी लागेल असे सांगीतले. त्यामुळे मी त्यांना जामीनदार व कागदपत्रे घेऊन येतो असे सांगून त्यांना रू. २०,०००/— इतकी दयावयाची रक्कम जास्त होत असुन कमी करण्याकरीता विनंती केली. त्यावर त्यांनी रू. १५,०००/— घेऊन एम्.आय.डी.सी. पोलीस ठाण्यास येण्यास सांगीतले. परंतू मी त्यांना सदरची रक्कमदेखील जास्त होत असुन रू. १०,०००/— शक्य होतील असे सांगीतले असता त्यांनी त्यास ठिक है चलेगा असे म्हणुन होकार दिला. त्यामुळे मी तेथुन पंच हेमंत वाघेरे यांचे समवेत निघुन पोलीस वाहने जेथे थांबली होती तेथे पुन्हा आलो.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी व पंच हेमंत वाघेरे यांनी घडलेली हकिकत पो.नि. घोडके यांना सांगितली. पो.नि. घोडके व स.पो.आ. देशमुख यांनी रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले व लाचेची मागणी झाल्याची त्यांची खात्री झाल्यानंतर मी माझ्याकडील लाच देण्यासाठीची माझे स्वबचतीतील रक्कम रु. १०,०००/— हजर केले. पो.नि. घोडके यांनी मला, पंचाना तसेच सापळा पथकातील अंमलदार यांना पुढील सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या व पी.एस्.आय. लोखंडे साहेबांना लाचेची रक्कम दिल्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने डाव्या हाताने हात रूमाल चेहऱ्यावरून वारंवार फिरवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा देण्याबाबत सांगीतले. त्यानंतर मी हजर केलेल्या लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासिन पावडर लावून सापळा पथकातील चालकाने माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व्हॉईस रेकॉर्डर लावून मी, पंच क्र. १ तसेच जामीनदार म्हणुन माझे सोबत येणारा श्री. भरत चुनिलाल रावल असे आम्ही रस्त्याने जाणारी ऑटोरिक्षा पकडून पी.एस्.आय. लोखंडे साहेबांनी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे बोलाविले असल्याने माझे उर्वरित काम करून घेऊन लाचेची रक्कम देण्याकरीता संबधीत आवश्यक त्या कागदपत्रांसह निघालो त्यावेळी २३.१० वा. होते. मी जामीनदारासह पी.एस्.आय. लोखंडे साहेबांना भेटलो असता त्यांनी तेथे जामीनासंबधीत कागदपत्रे तयार करून घेतली व आवश्यक त्या ठिकाणी माझ्या सहया व अंगठयाचे ठसे उमटवून घेतले व तडजोडीअंती ठरलेली लाचेची रक्कम रू. १०,०००/— माझेकडून स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणून माझी त्याच्यांविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून तो मला वाचून मराठी व हिंदीतून समजावून सांगितला असून, तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(अरूण घोडके)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Chetan

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

आलोसे विकास नामदेव लोखंडे यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम रु. १०,०००/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) रु. १०,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद ता. वे. व ठिकाणी यातील फिर्यादी श्री चेतन कांजी सत्रा यांचेविरुद्ध MIDC पो. ठाणे अंधेरी पूर्व, मुंबई येथे दाखल गुन्ह्यात अटक करुन कोर्टात न पाठविता पोलीस ठाणेस तात्काळ जामिन देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक विकास नामदेव लोखंडे, पोउनि MIDC पो. ठाणे मुंबई यांनी फि. कडे २०,०००/- रु. लाचेच्या रकमेच्या मागणीबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन त्यानंतर केलेल्या पडताळणी दरम्यान तडजोडअंती १०,०००/- लाचेची मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान १०,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारताना आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांचेविरुद्ध ला.प्र.वि. गु.क्र. ४३/२३, कलम ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक अरुण घोडके

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................ (3) Transferred to P. S. ................

District................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) Chetan

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... अरुण दत्तू घोडके

पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ............

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner